# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### मुंबई शहरात रस्त्याच्या दुतर्फा उभ्या करण्यात येत असलेल्या बेवारस वाहनांबाबत

**(१) १४६३९ (२५-०८-२०२२) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात रस्त्याच्या दुतर्फा उभ्या करण्यात येत असलेल्या बेवारस वाहनांचा शोध घेण्यासाठी बृहन्मुंबई महापालिकेने “गुगलची” मदत घेऊन कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने आतापर्यंत किती बेवारस वाहने जप्त करण्यात आली आहेत, या बेवारस वाहनांचे मालक सापडले आहेत काय, या वाहनांची विल्हेवाट लावण्याच्या अनुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-११-२०२२) :** (१) मुंबई शहरात रस्त्याच्या दुतर्फा उभ्या करण्यात येत असलेल्या बेवारस वाहनांचा शोध घेण्यासाठी “गुगलची” मदत घेऊन कारवाई करण्याचा निर्णय घेतलेला नाही, असे बृहन्मुंबई महापालिकेने कळविले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### वांद्रे (मुंबई) येथील १२० ते १३० मीटर उंचीचा आकाशपाळणा (मुंबई आय प्रकल्प) उभारण्याबाबत

**(२) १४६४७ (२५-०८-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (मुंबई) येथील १२० ते १३० मीटर उंचीचा आकाशपाळना (मुंबई आय प्रकल्प) उभारण्याच्या निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी रुपये १ हजार कोटींचा खर्च अपेक्षित असून मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) कार्यकारी समितीच्या बैठकीत माहे एप्रिल, २०२१ मध्ये मान्यता देण्यात आली असून एमएमआरडीएने या प्रकल्पासाठी सल्लागार नेमून रुपये १७.५५ कोटींचे कंत्राट सल्लागार कंपनीस देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पासाठी जागेची निवड करुन प्रकल्प आराखडा देण्याची व प्रकल्पाचे काम जलद गतीने करण्याची जबाबदारी कंत्राटदार कंपनीवर होती, तथापि, एमएमआरडीने सल्लागार कंपनीस वारंवार पत्रव्यवहार करुन प्रकल्प अहवाल सादर करण्याची सूचना देवूनही सल्लगार कपंनीने शासनास अहवाल सादर केला नसल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, एमएमआरडीएकडून संबंधित सल्लागार कंपनीने अदा केलेल्या रक्कमेची वसुली व अन्य कारवाई न करता ते कंत्राटच रद्द करुन आता पुन्हा निविदा मागविण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकल्पासाठी नवीन निविदा मागविण्यात आल्या आहेत काय, प्रकल्प उभारणीसाठी किती कालावधी लागणार आहे, प्रकल्प उभारण्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-१०-२०२२) :** (१), (२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २६८ व्या बैठकीमध्ये मुंबई आय प्रकल्पाबाबत व्यवहार्य-पूर्वाभ्यास करणे, तांत्रिक-आर्थिक व्यवहार्यता अभ्यास करणे, जागेची निवड करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा तयार करणे व एजन्सीच्या निवडीसाठी निविदा प्रकिया राबविणे आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा पुरविणे याकरीता सल्लागाराची नेमणूक करण्यास मंजूरी देण्यात आली होती. त्यानुषंगाने दिनांक १०/०८/२०२१ रोजी सल्लागारास सदर प्रस्तावित प्रकल्पासाठी कार्यादेश देण्यात आले होते. सल्लागारामार्फत कार्यादेशातील नमूद मुदतीमध्ये अपेक्षित असलेले अहवाल सादर करण्यास झालेल्या विलंबामुळे सल्लागारास देण्यात आलेला कार्यादेश दिनांक २५/०३/२०२२ रोजी रद्द करण्यात आला आहे.
(४), (५) व (६) सदर प्रकल्पासाठीचा मंजूर विनंती प्रस्ताव तसेच कार्यादेशामध्ये नमूद अटी व शर्तीनूसार सल्लागाराची अनामत रक्कम तसेच बँक हमी जप्त करण्यात आली आहे. प्राधिकरणामार्फत सल्लागारास आजपर्यंत कोणतेही रक्कम अदा करण्यात आलेली नाही. आजमितीस सदर प्रकल्पासाठी पुन्हा निविदा मागविण्यात आलेल्या नाहीत.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे निकष पूर्ण करुन शासकीय सेवेसाठी खुला प्रवर्गातून पात्र ठरलेल्या महिला खेळाडुंना शासन सेवत सामावून घेण्याबाबत

**(३) १४७६० (२५-०८-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक १३०३४ ला दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे निकष पूर्ण करुन शासकीय सेवेसाठी खुला प्रवर्गातून पात्र ठरलेल्या महिला खेळाडुंनी मागील चार वर्षातील शासन नियम आणि निर्णयाचे दाखले देवूनही महिला खेळाडूंना शासन सेवत सामावून घेण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनास निवेदन प्राप्त झाली असूनही शासनाने निवेदनाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-१०-२०२२) :** (१) याबाबत निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत.
(२) निवेदनाच्या अनुषंगाने माहिला व खेळाडू यांचे समांतर आरक्षणा संदर्भात मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे रिट याचिका क्रमांक ४१५९/२०१८, व मा.उच्च न्यायालय,मुंबई याचिका क्रमांक १२३५६/२०१९ देखील दाखल झाली होती. तसेच मा.सर्वोच्च न्यायालय येथे M.A.No. २६४१/२०१९ in SLP (civil)No.२३२२३/२०१८ अशी याचिका दाखल झाली होती. सदर सर्व याचिका न्यायालयाने फेटाळल्या असून, शासनाचे धोरण योग्य असल्याचे नमुद केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेवादारांच्या नियुक्त्या रखडल्याबाबत

**(४) १४८०० (२५-०८-२०२२) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा सन २०२० मध्ये घेण्यात आल्या असून अंतिम निवड झालेल्या ४१६ उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यसेवा परीक्षा-२०१९ द्वारे शिफारसप्राप्त ठरलेल्या ४१६ उमेदवारांपैकी ३५९ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आल्या असून उर्वरित उमेदवारांना नियुक्त्या देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) असल्यास, अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्त्या न देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सन २०२० मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये निवड झालेल्या सर्वच उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-१०-२०२२) :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्य सेवा परीक्षा, २०१९ चा निकाल १९/०६/२०२० रोजी घोषित केला असून सदर निकालान्वये गट अ व गट ब (राजपत्रित) संवर्गातील पदांसाठी ४१३ उमेदवारांची शिफारस करण्यात आली होती. सदर परीक्षेचा

सुधारीत निकाल आयोगाने दिनांक २८/०९/२०२१ रोजी घोषित केला असून या सुधारीत निकालान्वये गट अ व गट ब (राजपत्रित) पदांसाठी ४१६ उमेदवारांची शिफारस शासनास केली होती.

या निकालाच्या अनुषंगाने शिफारसप्राप्त ४१६ उमेदवार तसेच मुदतवाढ / न्यायालयीन प्रकरण इ. कारणास्तव नियुक्ती प्रलंबित असलेले ११ उमेदवार मिळून ४२७ उमेदवारांची चारित्र्य पडताळणी, वैद्यकीय तपासणी तसेच विहित कागदपत्रे / प्रमाणपत्रे पडताळणी करण्यात आली. सदर पडताळणी आणि तपासणी यांच्या अहवालांच्या अनुसार पात्र ठरलेल्या ३८१ (गट अ १९२ + गट ब १८९) उमेदवारांना एकत्रित परिवीक्षाधीन कार्यक्रम अंतर्गत "सीपीटीपी ७" या तुकडीमध्ये दिनांक १७ जानेवारी, २०२२ पासून प्रशिक्षणासाठी नियुक्ती देण्यात आली आहे.

चारित्र्य पडताळणी/ वैद्यकीय तपासणी तसेच विहित प्रमाणपत्रे पडताळणी अहवालानुसार अपात्र ठरलेले/ याअनुषंगाने न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असलेले तसेच शिफारसप्राप्त पद घेण्यास इच्छुक नसल्याचे कळविले आहे अशा उमदेवारांना सीपीटीपी ७ तुकडीमध्ये प्रशिक्षणासाठी रुजू करुन घेण्यात आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सी-सॅट पेपर केवळ पात्रतेसाठी ठेवण्याकरीता विद्यार्थ्यांनी मागणी केल्याबाबत

**(५) १४८०५ (२५-०८-२०२२) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सी-सॅट पेपर सुरु केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर राज्यामध्ये सी-सॅट पेपर केवळ पात्रतेच्या औपचारितेसाठी ठेवण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सी-सॅट हा पेपर गुणवत्ता पातळीनुसार उत्तीर्ण करणे अनिवार्य असल्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांकडून केवळ पात्र करावा अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-१०-२०२२) :** (१) होय.

(२) काही राज्यांमध्ये अशी वस्तुस्थिती आहे.

(३) होय.

(४) महाराष्ट्र लोकसेवा आयोग सांविधानिक दृष्ट्या स्वायत्त संस्था असून आयोगामार्फत परीक्षा प्रक्रिया राबविण्याचे धोरण ठरविले जाते. त्यामध्ये शासन स्तरावरुन कोणताही हस्तक्षेप केला जात नाही. तथापि, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या दिनांक २ मे, २०२२ च्या प्रसिध्दीपत्रकानुसार सी-सॅट पेपर अर्हताकारी करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य व सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(६) १४८०६ (२५-०८-२०२२) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे ३७० प्राचार्य व २०८८ सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे भरण्याचा निर्णय शासनाने माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रिक्त पदे भरण्यात आली आहेत काय, असल्यास, केव्हा, तसेच, अद्याप राज्यात किती प्राचार्य व सहाय्यक प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (१४-१०-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

दिनांक ०१/१०/२०१७ च्या विद्यार्थी संख्येनुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या ११७१ अशासकीय अनुदानित महाविद्यालयांत सहाय्यक प्राध्यापकांच्या अनुज्ञेय ३११८५ पदांपैकी २२२३६ पदे भरलेली असून ८९४९ पदे रिक्त आहेत.

प्राचार्य पद हे एकाकी पद व प्रशासकीय दृष्ट्या महत्वाचे पद असल्याने प्राचार्यांची रिक्त असलेली २६० पदे व भविष्यात रिक्त होणारी पदे भरण्यास वित्त विभागाने दिलेल्या सहमतीनुसार विभागाने दिनांक २३/०४/२०१८ रोजी आदेश निर्गमित केलेले आहेत.

सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील एकूण ४७३८ पदांना शासनाच्या दिनांक ०३/११/२०१८ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली होती. सदरहू मान्यता विचारात घेऊन, पदभरतीची कार्यवाही सुरू करण्यात आली होती. मात्र, कोविड-१९ च्या प्रादूर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत वित्त विभागाच्या दिनांक ०४/०५/२०२० च्या आदेशान्वये पदभरतीवर निर्बंध जारी करण्यात आल्याने, सद्य:स्थितीत वरील भरतीची प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. तथापि, सदरची पदे न भरल्यास होणारा परिणाम लक्षात घेता, उक्त खंडीत झालेली भरती प्रक्रिया वित्त विभागाच्या सहमतीने शासनाच्या दिनांक १२/११/२०२१ च्या आदेशान्वये सुरू करण्यात आलेली आहे.

राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय पदभरती करताना विषयनिहाय आरक्षण धोरणाचा अवलबं करण्यात येत होता.मात्र, केंद्राने संर्वगनिहाय आरक्षण धोरण केल्यामुळे, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ नुसार राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/संस्थांमधील शिक्षकीय पदांचे संवर्गनिहाय आरक्षण धोरण सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०१/०४/२०२२ रोजीच्या अधिसूचनेन्वये लागू करण्यात आलेले आहे. त्यानुसार त्याची अंमलबजावणी करण्याबाबत विभागाने दिनांक ०८/०४/२०२२ रोजीची अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे. त्यानुसार आरक्षण धोरणाची नेमकी कार्यपध्दती कशी असावी, याबाबत विभागाच्या दिनांक ११/०४/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार पदभरतीची कार्यवाही सुरू आहे.

---

## सांगली जिल्ह्यात भूमी-अभिलेख विभागात कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्यामुळे जमीन मोजणीचे अर्ज प्रलंबित असल्याबाबत

**(७) १४८०८ (२५-०८-२०२२) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यात भूमी-अभिलेख विभागात कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्यामुळे जमीन मोजणीसाठी आलेले हजारो अर्ज प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किती अर्ज प्रलंबित आहेत व केव्हापासून,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भूमी-अभिलेख कार्यालयात पुरेसा कर्मचारी वर्ग देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१४-१०-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सांगली कार्यालयाच्या अधिनस्त कार्यालयांकडे दिनांक १ एप्रिल, २०२१ पासून ते मे, २०२२ अखेर ७५८५ मोजणी प्रकरणे प्रलंबित आहेत.
(३) विभागाने शासन पत्र दिनांक २०/०७/२०२१ नुसार भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमूह ४ संवर्गातील सरळसेवेची १०२० रिक्त पदे भरण्यास मान्यता दिल्यानुसार भरती प्रक्रियेची कार्यवाही सुरू आहे. तसेच, मोजणी प्रकरणे जलद गतीने निपटारा करणेकरीता जिल्हा नियोजन समिती अंतर्गत १० CORS Rover खरेदी करण्याकरीता उपलब्ध झालेल्या निधीतून CORS Rover खरेदीची प्रक्रिया सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिमूर (जि.चंद्रपूर) सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत सावरी माकोना मार्गावर मुख्य नालीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(८) १४८२४ (२५-०८-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिमूर (जि.चंद्रपूर) सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत सावरी माकोना मार्गावर मुख्य नालीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे दिनांक ८ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (२०-१०-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत मंजूर सिमेंट कॉक्रीट नालीचे बांधकाम करणे हे काम दिनांक १५/१२/२०२१ ला पूर्ण करण्यात आले आहे.

सदर कामाची तपासणी राज्य गुणवत्ता निरीक्षक यांचेमार्फत करण्यात आली असून, काम समाधानकारक झाल्याचा शेरा निरिक्षण अहवालात नमूद आहे.

(३) काम समाधानकारक आहे.कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अकृषिक करप्रणालीचा फेरविचार करण्यासाठी शासनाने नेमलेल्या समितीबाबत

**(९) १४८३९ (२५-०८-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अकृषिक कराच्या बोजातून नागरिक, गृहनिर्माण संस्थांना दिलासा देण्यासाठी सध्याच्या अकृषिक करप्रणालीचा फेरविचार करण्यासाठी शासनाने दिनांक ६ जून, २०२२ रोजी महसूल विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू समितीतील सदस्यांचे आणि कार्यकक्षेचे थोडक्यात स्वरूप काय आहे तसेच समितीत स्थानिक लोकप्रतिनिधीचा समावेश करण्यात आला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू समितीच्या अहवालास किती कालावधी अपेक्षित आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने समितीचा अहवाल देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१०-२०२२) :** (१), (२), (३) व (४) होय. हे खरे आहे.

शासन निर्णय क्र. एनएपी-२०२२/प्र.क्र५०/ज-१अ, दिनांक ६ जून, २०२२ अन्वये, राज्यात सुधारित अकृषिक प्रमाणदराच्या आधारे, अकृषिक आकारणीच्या वसूलीस देण्यात आलेली स्थगिती उठविण्याबाबत व त्यासंदर्भात करावयाच्या अनुषंगिक अंमलबजावणीत सुसूत्रता आणण्याकरीता सर्वकष अभ्यास करून शासनास योग्य शिफारस करण्याकरीता अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे अभ्यास समिती गठित करण्यात आली आहे.

| अ.क्र. | समिती रचना व पदनाम | पद |
|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव (महसूल) | अध्यक्ष |
| २. | जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे | सदस्य |
| ३. | विभागीय आयुक्त, नाशिक | सदस्य |
| ४. | विभागीय आयुक्त, कोकण | सदस्य |
| ५. | सह सचिव (ज-१अ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य सचिव |

सदर समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहिल :-

अ) शासन परिपत्रक, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१८ मध्ये नमूद केलेल्या अकृषिक कराच्या मार्गदर्शन सूचनांबाबत फेरविचार करणे.

ब) सुधारित अकृषिक प्रमाणदर नव्याने निश्चित करणेबाबत विचार करणे.

क) अनुषंगिक बाबी विषयी शिफारशी करणे.

त्यानुसार, सदर समितीत स्थानिक लोकप्रतिनिधींचा समावेश करण्यात आलेला नाही. सदर समितीच्या बैठका वेळोवेळी शासन स्तरावर घेतल्या जात आहे. समितीने अहवाल शासनास अद्यापपर्यंत सादर केलेला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुरबाड येथील आरमोरी बाळेगाव या गावांमध्ये अवैध उत्खनन होणेबाबत.

**(१०) १४८५५ (२५-०८-२०२२) श्री.चंदूभाई पटेल :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.पालघर) येथील आरमोरी बाळेगाव या गावांमध्ये गट क्रमांक ८३ उम्रोली बुद्रुक इथे अवैध उत्खनन केल्याप्रकरणी महसूल विभागाने अवैध उत्खनन करणाऱ्या लोकांना कारवाईसाठी पत्र दिले असल्याची माहिती दिनांक २१ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने सदर पत्र दिल्यावर महसूल प्रशासनामार्फत अवैध उत्खनन करणाऱ्या दोषीं व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-१०-२०२२) :** (१), (२) व (३) मंडळ अधिकारी, टोकावडे यांनी मौजे उमरोली बु. येथील गट नं. ८३ मध्ये अनधिकृत गौण खनिज उत्खनन करून भराव केल्याबाबत तहसिलदार, मुरबाड यांना सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने तहसिलदार, मुरबाड यांनी संबंधिताना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४८(७) अन्वये अनधिकृत गौण खनिज उत्खननाबाबत नोटीस देण्यात आलेली असून, सदर प्रकरणी तहसिलदार मुरबाड यांचेस्तरावर सुनावणी सुरू आहे.

---

## नवी मुंबई (जि.रायगड) येथे महाराष्ट्र सदन बांधण्याबाबत

**(११) १४८८९ (२५-०८-२०२२) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई (जि.रायगड) येथे महाराष्ट्र सदन बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र सदर बांधकामासाठी किती खर्च अपेक्षित आहे व शासनाने त्यासाठी किती निधीची तरतूद केलेली आहे, महाराष्ट्र सदनाच्या बांधकामास केव्हा सुरुवात करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नवी मुंबई येथे महाराष्ट्र सदन बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१८-१०-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) वाशी, नवी मुंबई येथे “महाराष्ट्र भवन” अतिथीगृह बांधण्यासाठी सेक्टर-३०अ, मधील भूखंड क्र.११ ते १४ येथील एकूण ८३२२.९९ चौ.मी. जागा सिडको प्राधिकरणाकडून सार्वजनिक बांधकाम विभागास वर्ग करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत या भूखंडाचे भाडेशुल्क भरणेकरीता रुपये ३१,५०,५६,०००/- इतका निधी सिडको प्राधिकरणाकडे जमा करण्यात आला आहे. सदर भूखंडाबाबतचा अंतिम करारनामा झाल्यानंतर भूखंडाची संयुक्त मोजणी करुन मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांचेकडून आवश्यक ते आराखडे तयार केल्यानंतर बांधकामासाठीचे अंदाजपत्रक तयार करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिकेतील कचरा संकलन कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१२) १४९४७ (०४-०७-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे : तारांकित प्रश्न क्रमांक ११२७२ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिका क्षेत्रात कचरा संकलनाचे काम करणाऱ्या एव्हीजी व बीव्हीजी या कंपनी विरोधात अनेक तक्रारी प्राप्त असल्याने सन २०२१ मध्ये नागपूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत तत्कालीन महापौरांचे निर्देशानुसार चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने कंपनी विरोधात चौकशी करुन माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान चौकशी अहवाल नागपूर महानगरपालिका प्रशासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने समितीच्या अहवालानुसार सदरहू कचरा संकलन कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) कचरा संकलन करणाऱ्या कंपनीच्या कामात होत असलेल्या अनियमिततेमुळे होणाऱ्या त्रासाच्या संदर्भात तत्कालीन महापौर, नागपूर महानगरपालिका यांनी तत्कालीन सत्तापक्षनेता यांच्या अध्यक्षतेखाली ५ सदस्यीय चौकशी समिती गठित केली. सदर समितीव्दारे सविस्तर चौकशी करुन कचरा संकलनाच्या कामाकरीता नियुक्त दोन्ही एजन्सीच्या कामामध्ये नियमितता दिसून येत नसल्यामुळे दोन्ही एजन्सी ऐवजी नवीन एजन्सी तीन महिन्याच्या आत नियुक्त करण्याबाबत सभागृहाने विचार करावा असे निकर्ष नोंदवून समितीने अहवाल दिला. त्यानुषंगाने तात्कालीन महापौर यांनी वरिष्ठ कायदेतज्ञ यांचे कायदेशीर मत घेवून त्यांचे प्राप्त अभिमतानुसार पुढील कार्यवाही करावी अशी सूचना दिली. यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे नवीन श्वसन रोग प्रशिक्षण व संशोधन केंद्र सुरू करण्याबाबत

**(१३) १४९४८ (०८-०७-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे नवीन श्वसन रोग प्रशिक्षण व संशोधन केंद्र सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय विभागाला पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाला शासनाची व उपकरण खरेदीकरीता निधीची मंजुरी अप्राप्त आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पदव्युत्तर विद्यार्थ्यांना संशोधन व अध्ययन करण्याकरीता श्वसन रोग प्रशिक्षण व संशोधन केंद्र सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव व आवश्यक निधीस मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत काय ?

**श्री.गिरीश महाजन (०४-१०-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजा वेळा हरीश्चंद्र (ता.नागपूर) ग्रा.पं. हद्दीतील खसरा नं. १६ मधील ले-आऊट मधील प्लॉट धारकांची फसवणुक प्रकरणी तपास करणेबाबत.

**(१४) १४९८७ (०८-०७-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा वेळा हरीश्चंद्र (ता.नागपूर) ग्रा.पं. हद्दीतील खसरा क्र.१६ व प.ह.नं.३८ मधील आराजी ४/७६ हे.आर. मध्ये शेतजमीनीचे मूळ मालकाकडून जमीन ओम साई कन्स्ट्रक्शन यांनी १९९६ साली ले-आऊट तयार करून प्लॉटची खरेदी विक्रीचे नोंदणीकृत विक्रीपत्र करून रितसर नोंदणी करून अनेक गरीब नागरीकांनी प्लॉट खरेदी केले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्लॉट धारकांनी प्लॉटची मोजणी करून ताबा घेवून तारेचे कुंपन, सिमेंट पोल व फलक लावले असून रितसर ग्रा.पं. मध्ये प्लॉटवर कर आकारणी भरून संबंधित प्लॉटचा ताबा घेतला हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतजमीनीचे मूळ मालक व कंपनीचे मालकाचे निधन झाल्यामुळे संबंधित वारसदारांनी ही जागा गैरव्यवसायीकांना परत एकदा विक्री केलेली असून गैरव्यवसायकांनी प्लॉट धारकांनी केलेले कंपाऊड, तारेचे कुंपन व इतर बांधकाम बळजबरीने तोडून धमकी देवून ताबा करण्याच्या प्रयत्न केलेला आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मूळ प्लॉट धारकांनी संबंधित एन.एम.आर.डी.ए.,पोलीस विभाग, जिल्हाधिकारी, नोंदणी विभाग यांना लेखी तक्रार देवूनही याबाबत कुठलीही कार्यवाही कोणत्याही विभागाने केलेली नाही त्यामुळे तातडीने संपूर्ण प्रकरणाची तपासणी करण्याचे निर्देश तथा गैरव्यवसायीकांवर कारवाई करून मूळ प्लॉट धारकांना प्लॉटचा ताबा देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०४-१०-२०२२) :** (१), (२), (३) व (४) होय हे अंशत: खरे आहे. मौजा वेळा हरीश्चंद्र (ता.नागपूर) ग्रा.पं.हद्दीतील खसरा क्र. १६ व प.ह.न.३८ मधील आराजी ४.७६ हे आर पैकी आराजी ४.०५ हे.आर. ओम साई कन्स्ट्रक्शन तर्फे श्री चंद्रकांत विनायक काळे व देवराव रामकृष्ण सोळंके यांनी खरेदी केल्याचे दिसुन येत असून त्यांनी पाडलेल्या ले-आउट मधील ८ विक्री पत्र झाल्याचे प्लॉट धारकाच्या तकार अर्जासोबत प्राप्त झालेल्या विक्री पत्राच्या आधारे दिसुन येत असून याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयात कुठलीही माहिती उपलब्ध नाही. अधिकृत ले-आउट टाकलेला नसल्याने नेमका प्लॉट धारकांच्या ताब्याबाबत भाष्य करता येणार नाही.

खंड विकास अधिकारी, पंचायत समिती नागपूर यांच्या अहवालानुसार १०७ प्लॉटधारकांची कर आकारणी नोंदविले असून, काही प्लॉट धारकानी तात्पुरत्या स्वरूपाचे काटेरी व तारेचे कुंपन केलेले असल्याचे व त्यातील काही भाग मोडकळीस आले असल्याचे कळविले आहे. आराजी ४.७६ हे.आर पैकी बापुराव आत्माराम झलके यांचे नावे उर्वरित क्षेत्र ०.७१ हे आर दर्ज त्यांचा मृत्यू झाल्याने त्यांच्या वारसानांचे नाव दर्ज करण्यात आले. प्लॉट धारकांनी केलेली कंपाऊंड, तारेचे कुंपण व इतर बांधकामाबाबतची तक्रार प्राप्त झालेली असून सदरहु तकार पुढील कार्यवाही करीता पोलीस विभागाकडे पाठविण्यात आलेली आहे.

याबाबत उपविभागीय अधिकारी तसेच तहसिलदार यांच्याकडुन चौकशी सुरु असून, तसेच सदर तक्रार अनधिकृत ले-आउट संबंधाने असल्याने नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नागपूर यांना एम.आर.टी.पी. नुसार कार्यवाही करण्याबाबत पाठविण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजा गादा (ता.कामठी) येथील शासकीय पाणंद रस्ता शेतीच्या वहिवाटीकरीता वापरत असल्याबाबत

**(१५) १४९९४ (०८-०७-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा गादा (ता.कामठी) मधील येथे शेत सर्वे क्र. १४३ व १४४ तलाठी सा.जा. क्र. १९ मधील लागून असलेली शासकीय पाणंद रस्ता शेतकऱ्यांना शेतात वहिवाटी करीता उपलब्ध होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय पाणंद रस्ता शेतकऱ्याने दरवर्षी शेती वहिवाटीकरीता वापरून पूर्ण पाणंद रस्त्यावर अतिक्रमण करून शेतीची वहिवाट करत असल्याबाबत दिनांक ५ मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शेतकऱ्यांनी तहसिलदार कामठी यांना तक्रार दाखल करूनही अद्यापही कुठलीही कार्यवाही झालेली नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पावसामुळे शेती हंगामाचे काम सुरू होत असल्यामुळे शेतीची साधने व मशागतीचे सामान व ट्रॅक्टर नेण्यास अडचण येत असल्यामुळे शेतीवहिवाट केलेली अतिक्रमण पाणंद मोकळी करून रस्ता उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१४-१०-२०२२) :** (१), (२), (३) व (४) शासकीय पांदन रस्त्याबाबत शेतकऱ्याचा दिनांक ०५/०५/२०२२ रोजीचा अर्ज तहसिलदार कार्यालय, कामठी कार्यालयास दिनांक ०६/०५/२०२२ रोजी प्राप्त झाला असून मंडळ अधिकारी, कामठी व तलाठी सा.झा.क्र.१९ यांचेकडून संबंधित अर्जदार यांच्या समक्ष मौका चौकशी करण्यात आली आहे. तलाठी गादा यांचे दिनांक २१/०६/२०२२ चा अहवालानुसार मौक्यावर शेतकऱ्याची वहिवाट सुरु असून सदर पांदन रस्ता हा सर्व्हे नंबर १४४ व ४२ यामध्ये अरुंद झालेला आहे. तसेच सर्व्हे न. १४३, १४४ व ४२ मधून जलसंपदा विभागाची नाली व लगत पांदन आहे. त्यामुळे सदर रस्त्यावर कोणत्या बाजूने अतिक्रमण केले हे निश्चित करता येत नाही असे नमूद केल्यामुळे झालेले अतिक्रमण निश्चित करुन घेण्याकरीता दिनांक २७/०६/२०२२ रोजी उपअधीक्षक भूमी अभिलेख कामठी यांना पत्र देण्यात आले आहे. त्यानुसार सदर पांदन रस्त्याचे सिंमांकन झाल्यानंतर अतिक्रमण तात्काळ काढण्याची कार्यवाही करण्यात येईल.
तसेच नकाशावर अस्तित्वात असल्याप्रमाणे पांदन मोकळी करण्यात येईल.

---

## सेवापुस्तक तपासणीमध्ये आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने संगणक अर्हता प्रमाणपत्रे व इतर विहित कागदपत्रे सादर करण्याबाबत झालेला विलंब 'एक विशेष बाब' म्हणून माफ करणेबाबतचा प्रस्ताव

**(१६) १४९९९ (२५-०८-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेवापुस्तक तपासणीमध्ये आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने संगणक अर्हता प्रमाणपत्रे व इतर विहित कागदपत्रे सादर करण्याबाबत झालेला विलंब 'एक विशेष बाब' म्हणून माफ करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी अप्पर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग यांच्याकडे माहे मे, २०२२ च्या अंतिम सप्ताहात वा तत्पूर्वी सादर केला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रस्तावावर निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१९-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सेवापुस्तक तपासणीमध्ये आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने संगणक अर्हता प्रमाणपत्रे व टंकलेखन अर्हता प्रमाणपत्रे सादर करण्याबाबत झालेला विलंब एक विशेष बाब म्हणून माफ करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई यांनी दिनांक ३०/०९/२०२० रोजीच्या पत्रान्वये या विभागाकडे सादर केला

होता. प्रस्तावाची तपासणी करुन प्रस्तुत प्रकरणी निर्णय घेण्याच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने, टंकनेखक व संगणक अर्हता प्रमाणपत्रे सादर करणेबाबत झालेला विलंब क्षमापित करण्याबाबत कोणतीही तरतूद नसल्याने सदर कर्मचाऱ्याच्या बाबतीत विलंब क्षमापित करता येणार नाही, असे अभिप्राय दिले आहेत. सबब, सदर बाब दिनांक १४/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या निदर्शनास आणण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात जातनिहाय जनगणना करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(१७) १५०५७ (०५-०९-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जातनिहाय जनगणना करण्याचा प्रस्ताव मंजूर करुन केंद्र शासनास पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत केंद्र शासनाकडे करण्यात आलेल्या पाठपुराव्याचे थोडक्यात स्वरुप व प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-११-२०२२) :** (१) नाही.
(२) तथापि, दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी मा.अध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा यांनी सन २०२१ च्या सार्वत्रिक जनगणनेमध्ये मागास प्रवर्गातील लोकसंख्येची जातीनिहाय जनगणना करण्याची शिफारस या विषयाबाबत मांडलेला ठराव दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी सभागृहात चर्चा होऊन एकमताने संमत करण्यात आला. त्याअनुषंगाने दिनांक १० फेब्रुवारी, २०२० च्या पत्रान्वये सभागृहाने संमत केलेला ठराव पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सह संचालक, महारजिस्ट्रार व जनगणना आयुक्त कार्यालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना कार्यवाही करीता पाठविण्यात आला आहे. तसेच दिनांक २७ एप्रिल, २०२२ रोजी स्मरणपत्र पाठवून त्यावर केलेली कार्यवाही महाराष्ट्र शासनास कळविण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे. तथापि, केंद्र शासनाकडून याप्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती अद्यापपर्यंत अप्राप्त आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याच्या सिमावर्तीय भागातील तालुक्यामध्ये मराठी भाषेचा आणि साहित्याचा वापर आणि वावर दुय्यम दर्जाचा होत असल्याबाबत

**(१८) १५०६८ (०७-१०-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्याच्या सिमावर्तीय भागातील तालुक्यामध्ये मराठी भाषेचा आणि साहित्याचा वापर आणि वावर दुय्यम दर्जाचा होत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२२ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, राज्याच्या सिमावर्तीय भागात सात राज्य व एक केंद्रशासित प्रदेश त्यांच्या मातृभाषेचा प्रचार प्रसार करित असताना महाराष्ट्र शासनाकडून मराठी भाषेचा साहित्याचा वापर आणि वावर करण्यासाठी पुरेशा सुविधा मिळत नसल्याने मराठी भाषेला दुय्यम स्थान मिळत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्याच्या सीमावर्तीय भागा शेजारील गोवा, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा, छत्तीसगढ, मध्यप्रदेश, गुजरात, दादरा, नगर हवेली, दमन, दिव या राज्यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, महाराष्ट्राच्या सिमावर्तीय भागातील तालुक्यांमध्ये मराठी भाषेचा प्रसार प्रचार करण्यासाठी सर्व सिमा भागातील तालुक्यांमध्ये आणि मोठ्या गावांमध्ये मराठी भाषेचा वापर वाढविण्यासाठी मराठी भाषेची शाखा कार्यालये सुरु करुन मराठी साहित्य, भाषेचा प्रचार प्रसार करण्यात येणार आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुषंगाने सिमावर्तीय भागातील विविध तालुक्यांमध्ये मराठी भाषेचा आणि साहित्याचा वापर वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१०-११-२०२२) :** (१) महाराष्ट्र राज्याचा "सीमावर्ती भाग" याचा अर्थ महाराष्ट्राच्या सीमेपलिकडील भाग असा होतो. राज्याच्या सीमावर्तीय भागात असलेल्या राज्ये व केंद्रशासित प्रदेशांपैकी फक्त कर्नाटक राज्य वगळता कोणत्याही राज्याशी भाषिक वाद नाही.

महाराष्ट्र राज्यातील प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्याबाबत महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ व त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत (१. महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१, दिनांक १६/०७/२०२१ व २. महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) अधिनियम, २०२२ दिनांक ०७/०४/२०२२). या सुधारणांतर्गत सर्व विभागांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. राज्यातील सीमावर्ती भागासाठी वेगळ्या सूचना दिलेल्या नाहीत.

महाराष्ट्र राजभाषा सुधारणा अधिनियम, २०२१, दिनांक १६/०७/२०२१ मधील नियम ५(ड) मध्ये मराठीचा वापर होत नसल्याबाबतच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा मराठी भाषा समिती गठीत करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच जिल्हाधिकाऱ्यांना मराठी भाषेसंदर्भात उपक्रम राबविण्यासाठी शासन निर्णय दिनांक २४/०६/२०२२अन्वये निधी उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे.

विभागाच्या दिनांक १४/०६/२०२२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात मराठी भाषा संस्कृती व विकास यासाठी महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांना/मंडळांना अर्थसहाय्य करण्याचा (या विभागाच्या अधिपत्याखालील राज्य मराठी विकास संस्थेमार्फत) निर्णय घेण्यात आला आहे.
(२) महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त धोरणात्मक निर्णयानुसार मराठी भाषा प्राधान्याने शासकीय कामकाजात वापरण्यात येते.

मराठी भाषा विभाग, शासन निर्णय दिनांक १७/०४/२०१५ नुसार "बृहन्महाराष्ट्र मंडळांना अर्थसहाय्य" या उपक्रमांतर्गत महाराष्ट्राबाहेर मराठी भाषा, साहित्य, संस्कृती वृध्दींगत होण्यासाठी कार्य करणाऱ्या देशांतर्गत संस्थांना / मंडळांना रुपये २ लक्ष च्या मर्यादेत अनुदान देण्यात येते. सदर योजना राज्य मराठी विकास संस्थेमार्फत राबविण्यात येते. या योजनेंतर्गत महाराष्ट्राबाहेरील नवी दिल्ली, हैद्राबाद, भोपाळ, छत्तीसगड, तेलंगणा अशा ठिकाणीही अनुदान देण्यात येते. सदर योजनेला सीमावर्ती भाग असा निकष नाही.

मराठी भाषा विभागाच्या दिनांक १४/०६/२०२२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात मराठी भाषा संस्कृती व विकास यासाठी महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांना / मंडळांना अर्थसहाय्य करण्याचा (या विभागाच्या अधिपत्याखालील राज्य मराठी विकास संस्थेमार्फत) निर्णय घेण्यात आला आहे.

(३) राज्याच्या सीमावर्तीय भागामध्ये आंध्रप्रदेश या राज्याचा समावेश होत नाही.

(४) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय दिनांक १७/०४/२०१५ नुसार "बृहन्महाराष्ट्र मंडळांना अर्थसहाय्य" या उपक्रमांतर्गत महाराष्ट्राबाहेर मराठी भाषा, साहित्य, संस्कृती वृध्दींगत होण्यासाठी कार्य करणाऱ्या देशांतर्गत संस्थांना / मंडळांना रुपये २ लक्ष च्या मर्यादेत अनुदान देण्यात येते. सदर योजना राज्य मराठी विकास संस्थेमार्फत राबविण्यात येते.या योजनेंतर्गत महाराष्ट्राबाहेरील नवी दिल्ली, हैद्राबाद, भोपाळ, छत्तीसगड, तेलंगणा अशा ठिकाणीही अनुदान देण्यात येते.

मराठी भाषा विभागाच्या दिनांक १४/०६/२०२२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात मराठी भाषा संस्कृती व विकास यासाठी महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात कार्य करणाऱ्या मान्यता प्राप्त संस्थांना/ मंडळांना अर्थसहाय्य करण्याचा (या विभागाच्या अधिपत्याखालील राज्य मराठी विकास संस्थेमार्फत राबविण्याचा) निर्णय घेण्यात आला आहे.

(५) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय दिनांक १७/०४/२०१५ नुसार "बृहन्महाराष्ट्र मंडळांना अर्थसहाय्य" या उपक्रमांतर्गत महाराष्ट्राबाहेर मराठी भाषा, साहित्य, संस्कृती वृध्दींगत होण्यासाठी कार्य करणाऱ्या देशांतर्गत संस्थांना/ मंडळांना रुपये २ लक्ष च्या मर्यादेत अनुदान देण्यात येते. सदर योजना राज्य मराठी विकास संस्थेमार्फत राबविण्यात येते.या योजनेंतर्गत महाराष्ट्राबाहेरील नवी दिल्ली, हैद्राबाद, भोपाळ, छत्तीसगड, तेलंगणा अशा ठिकाणीही अनुदान देण्यात येते.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा केलेल्या ८६५ गावांमध्ये मराठी भाषिक नागरिकांमध्ये मराठी भाषेचा प्रचार व प्रसार होण्यासाठी शासन खालीलप्रमाणे उपक्रम राबवित आहे.

मराठी भाषा विभागाच्या दिनांक १४/०६/२०२२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात मराठी भाषा संस्कृती व विकास यासाठी महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात कार्य करणाऱ्या मान्यता प्राप्त संस्थांना / मंडळांना अर्थसहाय्य करण्याचा (या विभागाच्या अधिपत्याखालील राज्य मराठी विकास संस्थेमार्फत राबविण्याचा) निर्णय घेण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‍भवत नाही.

## पुणे शहरातील नागरीकांना अल्पदरात औषध पुरविण्यास शासकीय यंत्रणा अपयशी ठरत असल्याबाबत

**(१९) ३६९५४ (०२-०१-२०१८) श्री.अनिल भोसले, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३४३८६ ला दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात आरोग्य विभागाकडून खरेदी करण्यात आलेली स्वस्त दरातील जेनेरिक औषधे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यास शासकीय यंत्रणा अपयशी ठरत असल्याने रुग्णांचे आर्थिक शोषण होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार स्वस्त दरातील जेनेरिक औषधे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-११-२०२२) :** (१) व (२) महानगरपालिकेच्या रुग्णालयातून व दवाखान्यातून पुणे शहरातील रोज सुमारे ५००० रुग्ण बाह्यरुग्ण सेवेचा लाभ घेतात व २०० रुग्ण आंतर रुग्ण सेवेचा लाभ घेतात. महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयातून व दवाखान्यातून उपचार घेणाऱ्या सर्व नागरीकांना अत्य अल्पदरात औषध उपचार पुरविण्यात येतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना वेतनश्रेणी देण्याबाबत

**(२०) ३८५५० (०५-०४-२०१८) श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना तीन वर्षे शिक्षण सेवक म्हणून मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन वर्षे शिक्षण सेवक कालावधी पूर्ण झाल्यानंतर अशा उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना नियमित वेतनश्रेणी मान्यता देण्याचा अधिकार विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे असून असे प्रस्ताव त्यांच्याकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागीय उपसंचालक कार्यालयात राज्यातील किती नियमित वेतनश्रेणी मान्यता प्रस्ताव प्रलंबित आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांना नियमित वेतनश्रेणी मान्यता मिळण्याबाबत कार्यवाही करुन सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई कली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१२-१०-२०२२) :** (१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

शासन मान्यता प्राप्त अनुदानित उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना शासन निर्णय दिनांक १३/१०/२००० व दिनांक १०/०६/२००५ अन्वये शिक्षण सेवकाचा तीन वर्ष शिक्षण सेवक कालावधी पूर्ण झाल्यानंतर संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाकडून/ संस्थेकडून नियमित वेतनश्रेणी प्रस्ताव विभागीय उप संचालक कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर नियमित वेतनश्रेणी संदर्भीय शासन निर्णयातील विहित अटी व शर्ती यांची पूर्तता होत असल्यास नियमित वेतनश्रेणीत मान्यता दिली जाते. सदर प्रक्रिया नियमित स्वरुपाची आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.